**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महामंडळाच्या हद्दीत, पुणे मेट्रो मार्गिका क्र.३ ची आखणी, मेट्रो स्थानके व या स्थानकांच्या सभोवताली ५०० मीटर परिघापर्यंतचे क्षेत्र टी.ओ.डी. झोन (T.O.D. Zone) म्हणून दर्शविण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये निदेश...**

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

**शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३,**
**दिनांक :- ३०/०६/२०२०**

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१ चे प्रकरण VI च्या तरतुदी लागु होणारे क्षेत्र किंवा इतर जमिन, ज्या शासनाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास हस्तांतरीत केल्या आहेत, अशा जमिनींकरिता महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या (यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला) कलम ४०(१अ) अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास (यापुढे "उक्त प्राधिकरण" असे उल्लेखिलेले) विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्त केले आहे;

शासन नगर विकास विभागाने अधिसूचना क्र. टिपीबी-४३०८/४६५/प्र.क्र.६४/ ०८/नवि-११, दि.३१/०८/२००९ द्वारे उक्त प्राधिकरणाने सुधारीत केलेल्या विकास नियंत्रण नियमावलीस (यापुढे "उक्त नियमावली" असे उल्लेखिलेली) मंजुरी दिली असून उक्त नियमावली दि.२४/०९/२००९ पासून अंमलात आली आहे;

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार, उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये वाहतूक उन्मुख विकास [Transit Oriented Development (T.O.D.)] बाबतचा विनियम (यापुढे "उक्त विनियम" असे उल्लेखिलेला) समाविष्ट करुन उक्त विनियमाची अंमलबजावणी योग्य रितीने होवून ट्रान्झिट ओरिएन्टेड डेव्हलपमेन्ट (टी.ओ.डी.) मागील उद्देश साध्य होणेसाठी तसेच बृहत लोक हिताचे दृष्टीने विचार करुन उक्त विनियम उक्त नियमावलीत समाविष्ट करणेसाठी शासनाने महाराष्ट्र

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

C:\Users\Admin\Desktop\KVG\PMC\TOD\Hinjewadi-Shivajinagar_Notices, Directives\MIDC TOD Zone Directives_Sec.154.docx

Scanned with CamScanner

प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७(१कक) अन्वयेची सूचना क्र.टिपीएस-१८१८/९५०/प्र.क्र.१५८/१९/नवि-१३, दि.३०/०६/२०२० प्रसिध्द केली आहे.

या अनुषंगाने, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडील प्रस्तावानुसार, पुढील आवश्यकता म्हणून, महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या (राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान उद्यान, हिंजवडी, जि.पुणे) हद्दीत, पुणे मेट्रो मार्गिका क्र.३ ची आखणी, मेट्रो स्थानके व या स्थानकांच्या सभोवताली ५०० मीटर परिघापर्यंतचे क्षेत्र टी.ओ.डी. झोन म्हणून दर्शविणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे. सबब याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास पुढीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

*‘ निदेश ’*

“ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या (राजीव गांधी माहिती व तंत्रज्ञान उद्यान, हिंजवडी, जि.पुणे) हद्दीच्या नियोजन प्रस्तावामध्ये, पुणे मेट्रो मार्गिका क्र.३ (हिंजवडी-माण-शिवाजीनगर) ची आखणी, मेट्रो स्थानके व या स्थानकांच्या सभोवताली ५०० मीटर परिघापर्यंतचे क्षेत्र टी.ओ.डी. झोन म्हणून दर्शविण्याबाबतची कार्यवाही सत्वर करावी.”

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

( किशोर गोखले )
अवर सचिव,महाराष्ट्र शासन.

प्रति :-

मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी (पू), मुंबई.

प्रत :-

१) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य पुणे.

२) सहसंचालक, नगर रचना, पुणे विभाग, पुणे.

३) महानगर आयुक्त, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पुणे.

/- त्यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत आखणीच्या अनुषंगाने मार्गिकेची आखणी, स्टेशन्सचे स्थान इ. माहिती मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना पुरवावी.

४) सहायक संचालक, नगर रचना, पुणे शाखा, पुणे.



Scanned with CamScanner